असा. क्र. ३० रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८


# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सोमवार, ऑगस्ट ६, २००७/श्रावण १५, शके १९२९**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**


## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

### अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३.**— महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम . . . . | २४०–२५० |


दिनांक ४ ऑगस्ट २००७ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३.

( मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक ६ ऑगस्ट २००७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम. )

### महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

१९६६ चा महा. ४१.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६, यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) अधिनियम, २००७ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.



[ **किंमत** : रुपये ९.०० ]

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ९९ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त संहिता " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ९९ मध्ये,— १९६६ चा महा. ४१.

(क) " संबंधित विभागीय आयुक्ताकडे निर्देश करण्यासाठी " या मजकुराऐवजी, " महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे निर्देश करण्यासाठी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) " विभागीय आयुक्ताकडे " या मजकुराऐवजी, " महसूल न्यायाधिकरणाकडे " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) " विभागीय आयुक्त " या मजकुराऐवजी, " महसूल न्यायाधिकरण " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(घ) समासटीपेमध्ये, " विभागीय आयुक्त " या मजकुराऐवजी, " महसूल न्यायाधिकरणाकडे " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १०० ची सुधारणा.

**३.** उक्त संहितेच्या कलम १०० मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मध्ये, " विभागीय आयुक्ताकडे " या मजकुराऐवजी, " महसूल न्यायाधिकरणाकडे " आणि " त्याचे " या मजकुराऐवजी, " न्यायाधिकरणाचे " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२) मध्ये, " विभागीय आयुक्ताकडे " या मजकुराऐवजी, " महसूल न्यायाधिकरणाकडे " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ यामध्ये कलम २४५ समाविष्ट करणे.

**४.** उक्त संहितेच्या कलम २४४ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

व्यावृत्ती.

" **२४५.** या प्रकरणात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट प्रकरण पंधरा अन्वये महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणापुढे असलेल्या कोणत्याही कार्यवाहीला लागू असणार नाही. ".

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ यामध्ये कलम २४६ समाविष्ट करणे.

**५.** उक्त संहितेच्या प्रकरण तेरा मध्ये, " **अपिले, पुनरीक्षण व पुनर्विलोकन** " या शीर्षाखाली, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

हे प्रकरण लागू असणे.

" **२४६.** प्रकरण पंधरा अन्वये महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणापुढे असलेल्या कार्यवाहीला या प्रकरणाच्या तरतुदी लागू असणार नाहीत. ".

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २७१ ची सुधारणा.

**६.** उक्त संहितेच्या कलम २७१ मध्ये, " आयुक्ताकडे " या मजकुरानंतर, " किंवा यथास्थिति, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

७. उक्त संहितेच्या कलम २७२ मध्ये,— सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २७२ ची सुधारणा.

(क) " आयुक्ताकडे " या मजकुराऐवजी, " आयुक्ताकडे किंवा यथास्थिति, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) " जिल्हाधिकाऱ्याचे, आयुक्ताचे " या मजकुरानंतर " किंवा यथास्थिति, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ग) " आयुक्ताचे " या मजकुराऐवजी, " आयुक्ताचे किंवा महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

८. उक्त संहितेच्या कलम २७४ मध्ये,— सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २७४ ची सुधारणा.

(क) " संबंधित विभागीय आयुक्ताकडे " या मजकुराऐवजी, " महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) समासटीपेमध्ये, " संबंधित विभागीय आयुक्ताकडे " या मजकुराऐवजी, " महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

९. उक्त संहितेच्या कलम २७५ मध्ये, " विभागीय आयुक्तापुढील " या मजकुराऐवजी, " महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणापुढील " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २७५ ची सुधारणा.

१०. उक्त संहितेच्या प्रकरण चौदानंतर, पुढील प्रकरण समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ यामध्ये प्रकरण पंधरा समाविष्ट करणे.

" प्रकरण पंधरा

**महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण**

३०८. या प्रकरणामध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,— व्याख्या.

(क) " अध्यक्ष " या संज्ञेचा अर्थ, न्यायाधिकरणाचा अध्यक्ष, असा आहे ;

(ख) " न्यायाधिकरण " या संज्ञेचा अर्थ, कलम ३०९ अन्वये घटित केलेले महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, असा आहे.

३०९. (१) महाराष्ट्र राज्यासाठी महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण या नावाने ओळखण्यात येणारे एक न्यायाधिकरण स्थापन करण्यात येईल. महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण.

(२) न्यायाधिकरणात अध्यक्ष व राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियुक्त करील इतके इतर सदस्य यांचा समावेश असेल.

३१०. न्यायाधिकरणाचा अध्यक्ष व इतर सदस्य यांची अर्हता (वय धरून), त्यांच्या पदाची मुदत व त्यांच्या सेवेच्या शर्ती विहित करण्यात येतील अशा असतील. अध्यक्ष व सदस्य.

पद रिक्त होणे व तात्पुरती गैरहजेरी.

**३११.** (१) अध्यक्षाचे किंवा इतर सदस्याचे कोणतेही पद, तो मृत्यू पावल्यामुळे, त्याने राजीनामा दिल्यामुळे किंवा त्याच्या नेमणुकीची मुदत संपल्यामुळे किंवा त्याची नेमणूक संपुष्टात आणल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणांमुळे रिक्त झाल्यास ते पद योग्य अर्हताप्राप्त व्यक्तीची नेमणूक करून भरण्यात येईल.

(२) न्यायाधिकरणाचा कोणताही सदस्य, आजारीपणामुळे किंवा इतर वैफल्यामुळे आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यास तात्पुरता असमर्थ झाला असेल तर, त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी, राज्य शासनास, एका वेळी सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा कोणत्याही मुदतीसाठी, इतर कोणत्याही व्यक्तीची नेमणूक करता येईल, आणि अशा रीतीने नेमलेल्या व्यक्तीस त्या मुदतीत ज्या व्यक्तीच्या जागी तिची नेमणूक करण्यात आली असेल त्या व्यक्तीस जे अधिकार असतील तेच अधिकार असतील.

(३) पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या परिस्थितीमध्ये अध्यक्षाचे पद रिक्त झाले तर, ज्येष्ठतम सदस्य, राज्य शासनाकडून अध्यक्षाची नेमणूक करण्यात येऊन त्याचे पद भरण्यात येईपर्यंत अध्यक्ष म्हणून काम करील.

(४) केवळ, उपरोक्त पोट-कलमात उल्लेख केलेल्या कोणत्याही रिक्त पदाच्या किंवा तात्पुरत्या गैरहजेरीच्या कारणामुळे न्यायाधिकरणाची रचना बेकायदेशीररीत्या करण्यात आली आहे असे मानण्यात येणार नाही.

प्रबंधक व उप-प्रबंधक.

**३१२.** राज्य शासनाला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विहित करण्यात येईल अशी अर्हता असणारा न्यायाधिकरणाचा प्रबंधक नियुक्त करता येईल, आणि त्याच रीतीने अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रांसाठी विहित करण्यात येईल अशी अर्हता असणारे व विहित करण्यात येईल इतक्या संख्येत उप-प्रबंधक देखील नियुक्त करता येतील.

मुख्यालय.

**३१३.** न्यायाधिकरणाचे मुख्यालय बृहन्मुंबईत असेल.

बैठकीची जागा.

**३१४.** न्यायाधिकरणाच्या बैठकी सामान्यतः मुख्यालयात, औरंगाबाद व नागपूर येथे भरविण्यात येतील ; व तसेच अध्यक्ष, राज्य शासनाच्या अनुमतीने सामान्य किंवा विशेष आदेशानुसार निदेश देईल त्याप्रमाणे, कामकाज चालविण्यास सोयीस्कर असेल अशा, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही जागी बैठकी भरविता येतील.

न्यायाधिकरणाची अधिकारिता.

**३१५.** (१) या संहितेच्या प्रकरण तेरामध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु या कलमाच्या तरतुदींना अधीन राहून, अनुसूची ‘ ञ ’ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अधिनियमांच्या तरतुदींच्या अनुषंगाने उद्‌भवणाऱ्या प्रकरणांमध्ये,—

(क) जिल्हाधिकाऱ्याने काढलेल्या मूळ आदेशांविरुद्ध किंवा दिलेल्या निर्णयांविरुद्ध न्यायाधिकरणाकडे अपील करता येईल ; आणि

(ख) कोणत्याही दुय्यम अधिकाऱ्याने किंवा प्राधिकाऱ्याने काढलेल्या आदेशाविरुद्ध किंवा दिलेल्या निर्णयाविरुद्ध केलेल्या अपिलामध्ये, जिल्हाधिकाऱ्याने काढलेल्या आदेशाविरुद्ध किंवा दिलेल्या निर्णयाविरुद्ध न्यायाधिकरणाकडे पुनरीक्षणासाठी अर्ज करता येईल.

(२) पोट-कलम (१), खंड (ख) अन्वये, केवळ पुढील कारणांवरूनच पुनरीक्षणासाठी अर्ज करता येईल—

(एक) जिल्हाधिकाऱ्याचा आदेश किंवा निर्णय हा कायद्याविरुद्ध होता ;

(दोन) जिल्हाधिकाऱ्याने कायद्यासंबंधातील महत्त्वाच्या मुद्द्यांवर निर्णय घेण्यात कसूर केली होती ; आणि

(तीन) कायद्यान्वये घालून देण्यात आलेल्या कार्यरीतीचे पालन करताना मोठी उणीव राहिली होती व त्यामुळे न्यायदानाचा उद्देश विफल झाला होता.

(३) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमात स्पष्टपणे जी तरतूद केलेली असेल ती वगळता, राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, राज्य शासन ठरवील अशा इतर प्रकरणांत अशा व्यक्ती, अधिकारी व प्राधिकारी यांच्या निर्णयांविरुद्ध व आदेशांविरुद्ध करण्यात आलेली अपिले दाखल करून त्यांवर निकाल देण्याची व त्यांच्या निर्णयांचे व आदेशांचे पुनरीक्षण करण्याचीही न्यायाधिकरणास अधिकारिता असेल असा निदेश देता येईल ; आणि या प्रयोजनासाठी राज्य शासनाला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अनुसूची ' ञ ' मधील नोंदींपैकी कोणत्याही नोंदीत जादा नोंदी दाखल करता येतील, तीमध्ये दुरुस्ती करता येईल, किंवा तीमधून नोंदी वगळता येतील ; आणि त्यानंतर न्यायाधिकरणास अशा बाबीच्या संबंधात अधिकारिता असेल ; आणि त्या बाबतीतील इतर कोणत्याही व्यक्तीची, अधिकाऱ्याची किंवा प्राधिकाऱ्याची अधिकारिता संपुष्टात येईल.

(४) राज्य शासनाला, कोणत्याही वेळी तशाच रीतीने अशी अधिसूचना रद्द करता येईल किंवा अनुसूची ' ञ ' मधून कोणतीही नोंद वगळता येईल आणि अशी अधिकारिता पुन्हा स्वतःकडे घेता येईल :

परंतु, अशा रीतीने अधिकारिता परत घेतल्यावर राज्य शासनास, यातील कोणत्याही मजकुरामुळे, अशी कोणतीही अधिकारिता, कोणतीही इतर व्यक्ती, अधिकारी किंवा प्राधिकारी यांच्याकडे सोपविण्यास प्रतिबंध होणार नाही.

(५) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा कोणत्याही उपरोक्त बाबतीतील कोणत्याही व्यक्तीच्या, अधिकाऱ्याच्या किंवा प्राधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध आणि आदेशाविरुद्ध करण्यात आलेली अपिले दाखल करून घेण्याची व त्यांवर निर्णय देण्याची व त्यांच्या निर्णयांचे व आदेशांचे पुनरीक्षण करण्याची अधिकारिता न्यायाधिकरणास असेल तेव्हा, इतर कोणत्याही व्यक्तीस, अधिकाऱ्यास किंवा प्राधिकाऱ्यास उक्त बाबतीतील अशा व्यक्तीच्या, अधिकाऱ्याच्या किंवा प्राधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध व आदेशाविरुद्ध करण्यात आलेली अपिले दाखल करून घेण्याची व त्यावर निर्णय देण्याची व त्यांच्या निर्णयांचे व आदेशांचे पुनरीक्षण करण्याची अधिकारिता असणार नाही.

(६) या कलमान्वये करावयाचे प्रत्येक अपील किंवा पुनरीक्षणासाठी करावयाचा अर्ज जिल्हाधिकाऱ्याच्या आदेशाच्या किंवा निर्णयाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या मुदतीच्या आत दाखल करण्यात येईल. असे अपील किंवा पुनरीक्षणासाठी करावयाचा अर्ज दाखल करण्याच्या बाबतीत मुदत अधिनियम, १९६३ ची कलमे ४, ५, १२ व १४ यांच्या तरतुदी लागू होतील.

१९६३ चा ३६.

विवक्षित बाबतीत अधिकारितेस प्रतिबंध.

**३१६.** (१) न्यायालयात न्यायप्रविष्ट असलेल्या कोणत्याही प्रकरणाच्या बाबतीत न्यायाधिकरणास कोणतीही अधिकारिता असणार नाही.

(२) ज्या बाबतीत न्यायाधिकरणाच्या मते कोणताही अधिनियम, अध्यादेश किंवा विनियम याच्या किंवा अधिनियमातील, अध्यादेशातील किंवा विनियमातील कोणत्याही तरतुदीच्या विधिग्राह्यतेसंबंधी प्रश्न उपस्थित होत असेल आणि ती बाब निकालात काढण्यासाठी त्याच्या मते उपरोक्त अधिनियम, अध्यादेश वगैरेची विधिअग्राह्यता निश्चित करणे आवश्यक असेल त्या कोणत्याही बाबीच्या संबंधातही न्यायाधिकरणास कोणतीही अधिकारिता असणार नाही.

**स्पष्टीकरण.—** या कलमातील ' विनियम ' या संज्ञेचा अर्थ, मुंबई संहितेमधील कोणताही विनियम किंवा सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७ यात किंवा राज्याच्या कोणत्याही भागात अंमलात असलेल्या सर्वसाधारण वाक्खंड अधिनियमात व्याख्या केल्याप्रमाणे असलेला विनियम, असा आहे. (१८९७ चा १०.)

न्यायाधिकरणास इतर कायद्यान्वये मिळालेल्या अधिकारांस बाध येणार नाही.

**३१७.** या प्रकरणातील कोणत्याही मजकुरामुळे कोणतीही अपिले, पुनरीक्षणासाठी केलेले अर्ज किंवा इतर कामकाज दाखल करून घेण्यास आणि त्यांचा निर्णय करण्यास न्यायाधिकरणास त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये किंवा तदनुसार दिलेले किंवा देण्यात येतील असे कोणतेही अधिकार किंवा त्यांची कामे यांना बाध येणार नाही.

न्यायाधिकरणास दिवाणी न्यायालयाचा अधिकार असणे.

**३१८.** (१) या प्रकरणाद्वारे किंवा तदन्वये प्रदान केलेल्या अधिकारितेचा वापर करताना शपथेवर, प्रतिज्ञेवर किंवा प्रतिज्ञालेखाद्वारे पुरावा घेणे, साक्षीदारांना आज्ञापत्र काढून बोलावणे व हजर राहण्यास भाग पाडणे, दस्तऐवज व महत्त्वाच्या वस्तू शोधण्यास व सादर करण्यास भाग पाडणे, कोणत्याही न्यायालयातून किंवा कार्यालयातून कोणतेही सार्वजनिक अभिलेख किंवा त्याची कोणतीही प्रत मागवून घेणे, साक्षीदारांची जबानी घेण्यासाठी किंवा दस्तऐवजांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्रे काढणे या कारणांसाठी आणि विहित करण्यात येतील अशा इतर कोणत्याही कारणांसाठी, न्यायाधिकरणास दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ ची कलमे १९५, ३४५ व ३४६ यांच्या सर्व प्रयोजनांसाठी, न्यायाधिकरण हे दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल आणि त्याची कार्यवाही ही, भारतीय दंड संहितेची कलमे १९३, २१९ व २२८ यांच्या अर्थानुसार, न्यायालयीन कार्यवाही म्हणून मानण्यात येईल. (१९७४ चा २.) (१८६० चा ४५.)

(२) दाखल करावयाच्या कोणत्याही प्रतिज्ञालेखाच्या बाबतीत, या बाबतीत न्यायाधिकरणाने नेमलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, जबानीदारास शपथ देता येईल.

प्रथा व कार्यपद्धती.

**३१९.** (१) या प्रकरणाच्या तरतुदींस अधीन राहून, आणि राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने, अध्यक्षास न्यायाधिकरणाने खर्चाची रक्कम मंजूर करणे, कोणतीही आदेशिका फी आकारणे (न्यायालय शुल्क मुद्रांकाच्या स्वरूपात तिची वसुली करण्याबाबतच्या तरतुदींसह) न्यायाधिकरणापुढे, आपली बाजू मांडण्याचा हक्क, एकएकट्या सदस्याच्या किंवा अध्यक्षाने (किंवा अध्यक्षाने न्यायाधिकरणाच्या सदस्यांमधून प्राधिकृत केलेल्या सदस्याने) घटित केलेल्या सदस्यांच्या न्यायपीठाच्या बैठकी, न्यायाधिकरणाने किंवा त्यांच्या न्यायपीठाने, त्यांच्यापुढे असलेले कोणतेही कामकाज, उक्त कामकाज चालू असताना न्यायाधिकरणाचे

किंवा न्यायपीठाचे सदस्य म्हणून काम करणाऱ्या व्यक्तींमध्ये बदल झालेला असला तरी निकालात काढणे, या कामांसह न्यायाधिकरणाची प्रथा व कार्यपद्धती यांचे नियमन करण्यासाठी आणि सामान्यपणे, उक्त प्रकरणाखालील आपल्या अधिकारांचा प्रभावीपणे वापर करण्यासाठी आणि आपली कामे कार्यक्षमरीतीने पार पाडण्यासाठी विनियम करता येतील. जेथे कोणतेही सदस्य एकएकटे बैठकीचे काम पहात असतील किंवा जेथे कोणतेही न्यायपीठ घटित करण्यात आले असेल त्याबाबतीत असे सदस्य किंवा न्यायपीठ न्यायाधिकरणाच्या सर्व अधिकारांचा वापर करतील आणि त्याची सर्व कामे पार पाडतील.

(२) या कलमान्वये केलेले विनियम **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील.

**३२०.** (१) न्यायाधिकरणापुढील कोणत्याही कामकाजात, कोणत्याही टप्प्यावर, उक्त कामकाजामध्ये कायद्याचा अर्थ लावावा लागण्यासारखा प्रश्न उपस्थित होत असेल व तो प्रश्न अशा स्वरूपाचा व लोकांच्या दृष्टीने इतका महत्त्वाचा आहे की, राज्य शासनाला नोटीस देणे इष्ट आहे असे न्यायाधिकरणास दिसून आले तर, न्यायाधिकरण शासनाला नोटीस देईल आणि शासनाला त्यास योग्य वाटल्यास न्यायाधिकरणापुढे हजर राहता येईल व न्यायाधिकरण त्या प्रश्नावर निर्णय देण्यापूर्वी राज्य शासनाची बाजू ऐकून घेईल. विवक्षित बाबतीत राज्य शासनाची बाजू ऐकून घेणे.

(२) राज्य शासनाच्या मते न्यायाधिकरणापुढील कोणत्याही कामकाजात, कायद्यातील तरतुदीचा अर्थ लावणे हे अशा स्वरूपाचे व सार्वजनिकदृष्ट्या इतके महत्त्वाचे आहे की, त्या प्रश्नाचा निर्णय करण्यापूर्वी राज्य शासनाची बाजू ऐकून घेतली जाणे इष्ट आहे असे राज्य शासनाला आढळून आले तर, त्यास अशा कामकाजात आपली बाजू मांडण्यासंबंधी न्यायाधिकरणाकडे अर्ज करता येईल ; आणि न्यायाधिकरण, राज्य शासनाची बाजू ऐकून घेतल्याशिवाय त्या प्रश्नावर निर्णय देणार नाही.

**३२१.** (१) न्यायाधिकरणाने कलम ३१५ अन्वये अपील किंवा पुनरीक्षणविषयक आपल्या अधिकारांचा वापर करताना दिलेल्या कोणत्याही आदेशाविरुद्ध राज्य शासनाकडे कोणतेही अपील दाखल करता येणार नाही. राज्य शासनाकडे अपील दाखल करता न येणे आणि न्यायालयाच्या अधिकारितेस प्रतिबंध.

(२) न्यायाधिकरणाने या संहितेअन्वये किंवा तद्नुसार दिलेला प्रत्येक आदेश किंवा घेतलेला निर्णय अंतिम असेल व त्यावर कोणताही दावा किंवा इतर कायदेशीर कार्यवाहीद्वारे आव्हान देता येणार नाही.

**३२२.** (१) न्यायाधिकरणास स्वतः होऊन किंवा कोणत्याही हितसंबंधित पक्षकाराने अर्ज केल्यावर, आणि कलम ३२० अन्वये राज्य शासनाची बाजू ऐकून घेण्यात येईल त्याबाबतीत राज्य शासनाने अर्ज केल्यावर, कोणत्याही प्रकरणातील आपल्या स्वतःच्या निर्णयाचे किंवा आदेशाचे पुनर्विलोकन करता येईल व त्यास अनुलक्षून त्यास न्याय्य व योग्य वाटेल असा आदेश देता येईल : न्यायाधिकरणाच्या आदेशांचे पुनर्विलोकन.

परंतु, न्यायाधिकरणाने ज्यावेळी निर्णय दिला त्यावेळी एखाद्या पक्षकाराला, त्याने योग्य खबरदारी घेऊन देखील त्यास कळली नव्हती अशी नवी व महत्त्वाची बाब कळली आहे याबद्दल किंवा तो हजर करू शकला नाही असा नवीन व महत्त्वाचा पुरावा त्याला मिळाला आहे याबद्दल अथवा अभिलेखांवरून काही चूक किंवा दोष उघड दिसून येत असल्याबद्दल न्यायाधिकरणाची खात्री झाली असेल किंवा इतर कोणतेही पुरेसे कारण असेल ते वगळता, कोणत्याही पक्षकाराने केलेला असा कोणताही अर्ज दाखल करून घेण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, हितसंबंधित पक्षकारांना हजर राहण्यासंबंधी नोटीस दिली असल्याखेरीज व अशा आदेशाच्या पुष्ट्यर्थ त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्याखेरीज अशा निर्णयात किंवा आदेशात, बदल किंवा सुधारणा करण्यात येणार नाही.

(२) कोणत्याही पक्षकाराने किंवा, यथास्थिति, राज्य शासनाने, पोट-कलम (१) अन्वये पुनर्विलोकनासाठी करावयाचा अर्ज, न्यायाधिकरणाच्या निर्णयाच्या किंवा आदेशाच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत करता येईल :

परंतु, मुदत मर्यादा मोजताना, दिवाणी न्यायालयाच्या निर्णयाच्या किंवा आदेशाच्या पुनर्विलोकनासाठीच्या अर्जांना लागू होणाऱ्या मुदत अधिनियम, १९६३ च्या तरतुदी शक्य तेथवर या कलमान्वये पुनर्विलोकनासाठी केलेल्या अर्जांना लागू होतील. १९६३ चा ३६.

न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशांची अंमल-बजावणी करण्याची रीत.

**३२३.** न्यायाधिकरणाने दिलेल्या सर्व आदेशांची अंमलबजावणी राज्य शासनाने, किंवा यथास्थिति, इतर सक्षम प्राधिकाऱ्याने तसेच आदेश दिले असता त्यांची अंमलबजावणी ज्या रीतीने करण्यात आली असती त्याच रीतीने करण्यात येईल.

न्यायालय शुल्कासाठी तरतूद.

**३२४.** मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम, १९५९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु कलम २७५ च्या तरतुदींना अधीन राहून, न्यायाधिकरणाकडे केलेल्या प्रत्येक अपिलावर किंवा अर्जावर, जर दाव्यातील मालमत्तेचे मूल्य दहा हजार रुपये किंवा त्याहून कमी असेल तर शंभर रुपयाचा आणि जर असे मूल्य दहा हजार रुपयांहून अधिक असेल तर पाचशे रुपयांचा, न्यायालय शुल्क मुद्रांक लावण्यात येईल : १९५९ चा मुंबई ३६.

परंतु, जर न्यायाधिकरण कोणत्याही संबंधित कुळवहिवाट कायद्याखालील किंवा इतर विशेष कायद्याखालील कोणत्याही अधिकारांचा वापर करत असेल किंवा कामे करत असेल आणि उक्त कायद्यामध्ये न्यायाधिकरणाकडे करावयाच्या कोणत्याही अपिलावर किंवा अर्जावर न्यायालय शुल्क बसविण्याची तरतूद करण्यात आली असेल तर त्याबाबतीत, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे अशी फी आकारण्यासंबंधीच्या तरतुदीस बाध येणार नाही.

नियम.

**३२५.** (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या प्रकरणाची प्रयोजने पार पाडण्याकरिता या प्रकरणाच्या तरतुदींशी सुसंगत असतील असे नियम करता येतील.

(२) विशेषतः व उपरोक्त तरतुदीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमांत पुढील गोष्टींची तरतूद करता येईल :—

(क) न्यायाधिकरणाचा अध्यक्ष व इतर सदस्य यांच्या (वयासह) अर्हता ;

(ख) न्यायाधिकरणाचा अध्यक्ष व इतर सदस्य यांचा पदावधी व त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती ;

(ग) प्रबंधकाच्या व उप-प्रबंधकांच्या अर्हता ;

(घ) न्यायाधिकरणाकडे निहित करता येतील असे दिवाणी न्यायालयाचे इतर कोणतेही अधिकार. ”.

**११.** उक्त संहितेच्या कलम ३२८ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (छत्तीस) मध्ये, " विभागीय आयुक्ताकडून " या मजकुराऐवजी, " न्यायाधिकरणाकडून " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ३२८ ची सुधारणा.

२००७ चा महा २३. **१२.** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) अधिनियम, २००७ अंमलात आल्यावर, उक्त अधिनियम अंमलात येण्याच्या लगतपूर्वीच्या दिवशी विभागीय आयुक्ताकडे प्रलंबित असलेली सर्व प्रकरणे आणि कामकाज, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे वर्ग करण्यात येतील आणि उक्त संहितेच्या किंवा यथास्थिति, संबंधित कायद्याच्या तरतुदींन्वये न्यायाधिकरणाकडून ते निकालात काढण्यात येतील. प्रलंबित प्रकरणे आणि कामकाज वर्ग करणे.

**१३.** उक्त संहितेला जोडलेल्या अनुसूची झ नंतर पुढील अनुसूची समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ यामध्ये अनुसूची ञ समाविष्ट करणे.

**" अनुसूची ञ**

(कलम ३१५ पहा.)

| अनुक्रमांक | अधिनियमाचे नाव | पुढील तरतुदींच्या अनुषंगाने उद्‌भवणाऱ्या प्रकरणातील आदेशाविरुद्धची किंवा निर्णयाविरुद्धची अपिलीय किंवा पुनरीक्षणविषयक अधिकारिता. |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१). | कलम २४, कलम २७, खंड (ख) खेरीज करून कलम ५९, कलम ६५, कलम ६६. |
| २ | हैद्राबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९५० (सन १९५० चा हैद्राबाद अधिनियम क्रमांक २१). | कलम १८, पोट-कलम (२), कलम ४४, पोट-कलम (१), कलम ४७, कलम ४८, कलम ४९, कलम ७१, कलम ७५. |
| ३ | मध्यप्रदेश (संपदा, महाले, दुमाला जमिनी) स्वामित्वाधिकार नाहीसे करण्याबाबत अधिनियम, १९५०. (सन १९५१ चा मध्यप्रदेश अधिनियम क्रमांक १). | कलम २४, कलम २५, कलम २६, कलम २७. ". |

२००७ चा महा २३. **१४.** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) अधिनियम, २००७ द्वारे महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे पुनरूज्जीवन केल्यावर, या अधिनियमाला जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिनियमांमधील तसेच त्यापैकी कोणत्याही किंवा इतर अधिनियमांखाली काढण्यात आलेल्या कोणत्याही नियमांतील, विनियमांतील, उप विधींमधील, अधिसूचनांमधील, आदेशांमधील किंवा कोणत्याही विलेखातील महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण या निर्देशाचा अर्थ, जो महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अधिनियम, २००२ च्या कलम १४ च्या तरतुदींच्या आधारे विभागीय आयुक्त असा लावण्यात येत होता, त्याचा निर्देश आता महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण असा करण्यात येईल. (२००२ चा महा. २५.) विभागीय आयुक्त असा निर्देश जेथे आला असेल तेथे त्याचा अन्वयार्थ लावणे.

## अनुसूची

(कलम १४ पहा)

### महसूल अधिनियम

१. हैद्राबाद पाल्याधिकरण अधिनियम.

२. हैद्राबाद मुद्रांक अधिनियम.

### कुळवहिवाट अधिनियम

३. मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८.

४. हैद्राबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९५०.

५. मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम, १९५८.

### जमीनधारणेची कमाल मर्यादा

६. महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१.

### सत्ताप्रकार नाहीसे करण्याबाबत अधिनियम

७. मुंबई खोती नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९४९.

८. मुंबई परगणा व कुलकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५०.

९. साष्टी भूसंपत्तीबाबत (जमीन महसुलाची माफी रद्द करण्याविषयी) अधिनियम, १९५१.

१०. मुंबई जात इनामे नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५२.

११. मुंबई विलीन प्रदेशातील (जंजिरा व भोर) खोती सत्ताप्रकार नाहीसा करण्याबाबत अधिनियम, १९५३.

१२. मुंबई कौली व कटुबाण सत्ता प्रकार नाहीसे करण्याबाबत अधिनियम, १९५३.

१३. मुंबई विलीन प्रदेश व क्षेत्रे (जहागिऱ्या नाहीशा करण्याबाबत) अधिनियम, १९५३.

१४. मुंबई समाजास उपयुक्त सेवा इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५३.

१५. मुंबई भू-सत्ता प्रकार नाहीसा करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, १९५३.

१६. मुंबई भिल्ल नाईक इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५५.

१७. मुंबई विलीन प्रदेश किरकोळ दुमाला व वहिवाटी नाहीसा करण्याबाबत अधिनियम, १९५५.

१८. मुंबईचा शेटगी वतन हक्क (रत्नागिरीचे) रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५६.

१९. मुंबईचा गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५८.

२०. मध्यप्रदेश (संपदा, महाल, दुमाला जमिनी) स्वामित्वाधिकार नाहीसे करण्याबाबत अधिनियम, १९५०.

२१. महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) अधिनियम, १९६२.

२२. पश्चिम खानदेश मेवासी संपदा (स्वामित्वाधिकार नाहीसे करणे, इत्यादी) विनियम, १९६१.

### इतर अधिनियम

२३. मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५०.

२४. मुंबई वंशपरंपरागत पद अधिनियम, १८७४.

२५. महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४.

२६. महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई